# 8 मतदारसंघातील 160 उमेदवारांचे भविष्य पेटीत बंद

## मेळघाटमध्ये सर्वाधिक 71.75 टक्के, तर अमरावती मतदारसंघात सर्वात कमी 55.98 टक्के

### जिल्हाभरात 65.46 टक्के मतदान

### 60 तासांनी होणार मतदान मोजणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.20)**- जिल्ह्यातील 8 विधानसभा मतदारसंघात एकूण 2682 मतदान केंद्रांवर बुधवारी(दि.20) लहान-मोठ्या घटना वगळता शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. आठही मतदारसंघात 65.46 टक्के मतदान झाले. मात्र, रात्री 9 वाजेपर्यंतच्या मतदानाची अंतिम आकडेवारी निवडणूक प्रशासनाकडून प्राप्त झालेली नव्हती. 160 उमेदवारांचे भविष्य ईव्हीएमच्या पेटीमध्ये बंद झाले. विशेष म्हणजे मेळघाटातील अनेक मतदान केंद्रांवर सायंकाळी उशिरापर्यंत मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. मेळघाटमध्ये सर्वाधिक 71.75 टक्के, तर अमरावती मतदारसंघात सर्वात कमी 55.98 टक्के मतदान झाल्याची माहिती आहे. आतापासून 60 तासांनी म्हणजेच शनिवार (23 नोव्हेंबर) रोजी मतमोजणी होणार आहे. त्यानंतरच कोणत्या उमेदवाराचे नशीब फडफडले आणि कुणाचे राजकारण गोठले हे स्पष्ट होईल.



### मतदारसंघनिहाय मतमोजणीचे ठिकाण

- अमरावती व बडनेराचे - लोकशाही भवन, विद्यापीठ मार्ग
- धामणगाव - आयटीआय इमारत, चांदूरेल्वे
- तिवसा - तहसील कार्यालय
- दर्यापूर - कृषी उत्पन्न बाजार समिती गोदाम
- मेळघाट - नवीन प्रशासकीय भवन, धारणी
- अचलपूर - कल्याण मंडपम, परतवाडा
- मोर्शी - शासकीय धान्य गोदाम, मोर्शी

### अशी आहे मतदारसंघनिहाय आकडेवारी

| मतदारसंघ व क्रमांक | मतदानाची टक्केवारी |
|---|---|
| मेळघाट(41) | 71.75 |
| अचलपूर(42) | 72.14 |
| मोर्शी(43) | 71.03 |
| दर्यापूर(40) | 65.84 |
| तिवसा (39) | 67.01 |
| धामणगाव रेल्वे(36) | 67.21 |
| बडनेरा (37) | 57.57 |
| अमरावती(38) | 55.98 |

**नागरिकांचा उत्साह कमी**

बुधवारी सकाळी 7 वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. परंतु दुपारी 1 वाजेपर्यंत पाहीजे त्या प्रमाणात मतदान झाले नव्हते. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत विधानसभा निवडणुक मतदानाच्या टक्केवारीत फारशी वाढ झाली नाही. जिल्ह्यातील 25 लाख 46 हजार 458 मतदारांपैकी 65.46 टक्के मतदारांनी सायंकाळी 6 वाजेपर्यंत मतदानाचा हक्क बजावला. सर्व मतदान केंद्रांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी बाहेर राज्यातील गृहरक्षक (होमगार्ड) दलाची शिपाईसुध्दा पोलिस कर्मचाऱ्यांच्या दिमतीला होते.

### दुपारनंतर झाली वाढ

| मतदार संघ | 9 वाजता | 11 वाजता | 1 वाजता | 3 वाजता | 6 वाजता |
|---|---|---|---|---|---|
| अमरावती | 4.63% | 17.33% | 31.32% | 39.27% | 55.98% |
| बडनेरा | 6.32% | 16.2% | 30.08% | 42.47% | 57.57% |
| अचलपुर | 8.77% | 22.29% | 37.52% | 53.03% | 71.14% |
| दर्यापुर | 4.70% | 15.4% | 27.20% | 45.50% | 65.84% |
| धामणगांव रेलवे | 4.35% | 15.41% | 28.55% | 45.15% | 67.59% |
| मेलघाट | 6.20% | 18.16% | 35.49% | 50.62% | 71.75% |
| मोर्शी | 7.34% | 19.99% | 34.00% | 48.94% | 71.30% |
| तिवसा | 6.75% | 15.47% | 27.13% | 38.31% | 67.01% |
| सरासरी | 6.06% | 17.45% | 31.32% | 45.13% | 65.46% |





अमरावती-जिल्ह्यातील विविध मान्यवरांनी आपला मतदाना हक्क बजावून आपल्या बोटावरील शाई दाखवित काढलेले छायाचित्र.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# राजीव गांधी मतदान केंद्रावरुन 8 ईव्हीएम बेपत्ता?

## प्रिती बंड, तुषार भारतीयसह 3 हजाराहून अधिक लोक केंद्रावर धडकले

### कडेकोड पोलीस बंदोबस्त, निवडणूक अयोगाचे अधिकारी दाखल



## दुचाकीवरुन वाहून नेल्याचा आरोप





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )** - बडनेरा मतदारसंघातील गोपाल नगर स्थित स्व.राजीव गांधी महाविद्यालय या केंद्रावरुन 8 ईव्हीएम बेपत्ता झाल्याने प्रचंड खळबळ उडाली. हे ईव्हीएम दुचाकीवरुन नेल्याचा आरोप उमेदवार प्रिती बंड, तुषार बंड यांच्याकडून करण्यात आल्या. तसा व्हिडीओसुध्दा वायरल झाला आहे. या प्रकारानंतर जवळपास 3 हजाराहून अधिक लोक या केंद्रावर धडकले होते. अप्रिय घटना टाळण्याकरिता पोलिस विभागाने येथे कडेकोट पोलीस बंदोबस्त लावला होता, तसेच निवडणूक आयोगाचे अधिकारीसुध्दा येथे दाखल झाले होते.

अमरावती जिल्ह्यातील बडनेरा मतदारसंघावर अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागुन आहे. माजी खासदार नवनित राणा यांचे पती आ.रवी राणा यांना अपक्ष उमेदवार प्रिती बंड यांनी त्यांना तोडीस तोड लढत दिली. प्रिती बंड यांना पराभूत करण्याकरिता प्रस्थापितांनी साम, दाम, दंड, भेदाचा वापर केला. असे असताना बुधवारी(20) मतदानाच्या दिवशी गोपाल नगर येथील स्व.राजीव गांधी महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये 5 मतदान केंद्र स्थापित करण्यात आले होते. एका मतदान केंद्रावर दोन ईव्हीएम अश्या 10 ईव्हीएम येथे होत्या. संध्याकाळी 6 वाजता निवडणूक प्रक्रीया आटोपल्यानंतर ईव्हीएमच्या पेट्या सिल करण्यात आले. दहा पैकी 8 पेट्या येथीलच कर्मचाऱ्यांनी दुचाकीवरुन कुठेतरी नेल्या, या पेट्या नेमक्या कोठे हे कुणालाच माहित नव्हते, मात्र या प्रकाराचा व्हिडीओ वायरल होताच येथे उमेदवार प्रिती बंड, तुषार भारतीय व त्यांचे समर्थक मोठ्याप्रमाणात धडकले. यावेळी प्रिती बंड प्रचंड आक्रामक भूमिकेमध्ये दिसत होत्या. त्यांनी आमच्या समक्ष या सर्व प्रकाराची चौकशी करुन, दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली.

### अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीचे उत्तरे

यावेळी येथे उपस्थित अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात होती, एकमेकांच्या वाक्यात साधर्म्य येत नसल्याने येथे मोठ्याप्रमाणात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. पोलिस प्रशासनाचे अधिकारीही येथे पोहोचले होते. मोठे वाहन येथंपर्यंत येवू न शकल्याने वाहनापर्यंत या पेट्या दुचाकीवर नेल्याचे सांगण्यात येत होते, परंतू जेव्हा पेट्या आणण्यात आल्या तेव्हा मोठे वाहन येथे कसे आले, असा प्रश्न उमेदवार त्यांना विचारित होते. रात्री उशिरापर्यंत या ठिकाणी गोंधळाची परिस्थिती होती.

### ईव्हीएम सुरक्षीत -प्रशासन

बडनेरा येथील येथील दुचाकी वर ईव्हीएम नेण्याप्रकरणी प्रशासनाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यांनी सांगितले की, सदरील मतदान केंद्रावरील सर्व ईव्हीएम निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सुरक्षित आहे. याबाबत नागरिकांमध्ये झालेल्या संभ्रमाबाबत स्वत: निवडणूक निर्णय अधिकारी मतदान केंद्रावर पोहचले आहे. ईव्हीएम बाबत कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. असे स्पष्टीकरण जिल्हा प्रशासन देण्यात आले.




### स्थानिक आमदार गप्प का ?

या पेट्यांमध्ये आमच्या पाच वर्षांची मेहनत आहे. आमच्यासारखे यामध्ये विद्यमान आमदारांनांही पडलेली मतं कैद आहे, परंतू आतापर्यंत ते येथे आले नाहीत, स्थानिक आमदार या प्रकारावर गप्प का ? असा प्रश्न यावेळी प्रिती बंड यांनी प्रशासनाला विचारला.

# मेळघाटात मतदारांचा निवडणुकीत उत्स्फूर्त प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि. 20 )**- मेळघाटात मतदाराने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दाखवला अनेक ठिकाणी मतदारांच्या रांगा लागल्या होत्या, मेळघाटातील अतिशय दुर्गम भागातील आदिवासी बांधवांनी मतदानाचा हक्क बजाविला. दुपारपर्यंत 50 टक्क्यांच्यावर मतदान झाले. अनेक ठिकाणी नवीन मतदारांनी सुद्धा मतदानाचा हक्क बजाविला. चिखलदरा, धारणी व अचलपूर अर्धा तालुका असे मिळून मेळघाट मतदार संघात 354 मतदान केंद्रावर मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला. एकूण मेळघाट मतदार संघामध्ये 15 उमेदवारांनी नामांकन निवडणुकीच्या रिंगणात आहेत. पंधराही उमेदवारांचे नशीब मशीन बंद झाले आहे. दरम्यान मशीन बंद होऊन निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण झाला होता. मात्र नंतर सुधारणा करित प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात आणली.





### 14 मतदारांसाठी घनदाट जंगलात मतदान केंद्र

चिखलदरा पासून दहा किलोमीटर घनदाट जंगलात असलेल्या पसतलई या गावात फक्त 14 मतदार असून या 14 मतदारांसाठी एक मतदान केंद्र होते. या मतदारांसाठी सात कर्मचारी या ठिकाणी होते. या 14 पैकी पाच मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये 4 पुरुष तर 1 महिलेने आपला मतदानाचा हक्क बजाविला. या मतदान केंद्राची सर्वत्र चर्चा होती हे विशेष.

## व्यवस्थापकावर चाकू हल्ला

**अमरावती-** बजाज फायनान्समधून कर्जाचा हप्ता मागण्यासाठी गेलेल्या व्यवस्थापकावर चाकू हल्ला केला. ही घटना नांदगाव खंडेश्वर येथील बुधवारा परिसरात 19 नोव्हेंबर रोजी दुपारी 12 वाजता घडली. व्यवस्थापक यासीर सकलेन मोहासीन (28, रा. खाटीकपुरा, दारव्हा, यवतमाळ) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गणेश अशोक तुपटकर (रा.बुधवारा, नांदगाव खंडेश्वर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास पोलीस करीत आहे.

## अंजनगाव बारीत 65.00 टक्के मतदान



**अंजनगाव बारी-** अंजनगाव बारीत सायंकाळी 6 वाजेपर्यंत सरासरी 65 टक्के मतदान झाले आहे. एकूण 7095 मतदारांपैकी 5200 मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

# गाईच्या तोंडात फुटला गावठी बॉम्ब

### खालचे जांभाळ उडाले, जीभ तुटली



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**- माहुली जहांगीर पोलिस स्टेशन अंतर्गत करजगाव येथे सुरेश मह्लूजी धोटे या शेतकऱ्याच्या गाईच्या तोंडात गावठी बॉम्ब फुटल्याने गाईच्या खालचे तोंड पुर्णपणे उडाले, जीभही तुटली. ही घटना बुधवारी(दि.20) सकाळच्या सुमारास घडली.

रान डुकराची शिकार करण्याकरिता शिकाऱ्यांनी हे गावठी बॉम्ब गायरानमध्ये टाकून ठेवले होते. धोटे यांची गाय चरत असताना गायीच्या तोंडात बॉम्ब फुटला. या घटनेमूळे धोटे यांचे 60 हजाराचे नुकसान होत आहे. एक वर्षा पुर्वी याच शेतकऱ्यांच्या गोठ्याला आग लागून जवळपास 4 लाख रुपयांचे नुकसान झाले होते. तर 8 दिवसा अगोदर एका गायीचा होरपळून गायीचा मृत्यू झाला. तेव्हा सुद्धा त्यांचे 70 हजार रुपयाचे नुकसान झाले होते. या प्रकारे शेतकऱ्याचे बरेच नुकसान झाले आहे. तरी शेतकऱ्याला सरकारने नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी गावकरी करीत आहेत

# मेळघाटातील सहा गावांचा मतदानावर बहिष्कार कायम

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती-** आम्हाला मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध नाही, मग तुम्हाला 'मतदान' नाही, अशी भूमिका घेत मेळघाट परिसरातील 6 गावांनी विधानसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकला आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज 20 नोव्हेंबर मतदान पार पडत आहे. सकाळी 7 वाजल्यापासून मतदानाला सुरवात झाली. संध्याकाळी 6 वाजेपर्यंत मतदान सुरू असणार आहे. जिल्ह्यात मतदानासाठी कुठे चांगला प्रतिसाद मिळत आहे तर कुठे मतदानासाठी कमी प्रतिसाद मिळत आहे.अशातच मेळघाट परिसरातील आदिवासी समाज बांधवांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे. तेथील मतदान केंद्रावर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील 6 गावांनी मतदानावर बहिष्कार टाकला असून यामध्ये रंगूबेली ग्रामपंचायतच्या अंतर्गत येणाऱ्या धोकरा, किन्ही खेडा , कुंड, खादमा आणि खोकमार या गावांचा समावेश आहे. या संपूर्ण गावांमध्ये एकूण 1 हजार 300 मतदार आहेत. सर्वच मतदारांनी मतदानावर बहिष्कार टाकला. गावामध्ये रस्ते, पाणी, नाल्या, वीज यासारख्या मुलभूत सोयी सुविधा नाहीत. या समस्या न सुटल्यामुळे नागरिक आक्रमक आहेत. आधी आम्हाला मूलभुत सोया सुविधा द्या, आमच्या समस्या सोडवा, मगच मतदान मागायला या अशी भूमिका येथील गावकऱ्यांनी घेतली आहे.

**लोकसभेतही केले नव्हते मतदान**

# अमरावतीत अनाथ, दिव्यांग महिलांनी पहिल्यांदाच बजावला मतदानाचा हक्क

### जिल्ह्यात 12 लाख 45 हजार 684 महिला मतदार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** - अमरावतीमधील जवळपास 80 अनाथ आणि दिव्यांग महिलांनी 20 नोव्हेंबर रोजी पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावलाय. शहरातील इशदया चॅरिटेबल मदर टेरेसा मिशनरी ऑफ चॅरिटी या ठिकाणी अनेक वर्षांपासून अनाथ, निराधार आणि दिव्यांग महिलांना आधार दिला जातो. सध्या या ठिकाणी अशा एकूण 80 महिला आहेत. यापैकी तीन-चार महिला वगळता कोणाचीही जन्मतारीख यासह त्यांचं नाव आणि गावाचाही पत्ता नव्हता. त्यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. सामाजिक कार्यकर्ता डॉ. स्मिता साठे यांच्या प्रयत्नांनंतर या सर्व महिलांची जन्मतारीख निश्चित करुन ती शासनाकडून अधिकृत करण्यात आली. शासनाकडून जन्मतारखेचे दाखले प्राप्त झाल्यानंतर या महिलांचे आधार कार्ड काढण्यात आले. यानंतर मतदार म्हणून त्यांच्या नावाची नोंदणी करण्यात आली. या सर्व महिलांना इशदया संस्थेच्या विशेष वाहनानं मतदान केंद्रावर आणण्याची आणि नेण्याची व्यवस्थादेखील करण्यात आली.

# चांदूर बाजार तालुक्यात शांततेत पार पडले मतदान

## 188 मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया | तिरंगी लढतीचे चित्र; कोण उधळणार विजयाचा गलाल ?





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, (दि.20)** - अचलपूर विधानसभा मतदार संघासाठी आज दिनांक 20 नोव्हेंबर 2024 ला चांदूर बाजार तालुक्यातील 188 मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडली. सर्वच मतदार केंद्रावर शांततेत मतदान पार पडले. ग्राम कुऱ्हा देशमुख येथील मतदान क्रमांक 89 वर व्हीव्हीपॅट मध्ये मतदान केल्यावर स्लिप दिसत नव्हती, त्यामुळे सकाळी 11.25 ते 11.40 पर्यत त्या ठिकाणी मतदान प्रक्रिया थांबली होती. नंतर निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी व्हीव्हीपॅट बदलून घेतली.

तालुक्यातील मतदान केंद्रावर सकाळ पासून मतदानाला चांगला प्रतिसाद मिळाला सकाळी 7 ते 9 वाजता दरम्यान ची मतदान ची टक्केवारी 8.77 टक्के इतकी होती. त्यानंतर 11 वाजता 22.29 टक्के, 1 वाजता 37.52 टक्के, दुपारी 3 वाजता 53.03 टक्के, 5 वाजता 67.53 टक्के इतकी मतदान टक्केवारी झाली होती.

तालुक्यातील मतदान केंद्रावर मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्र पोलीस यांचा बंदोबस्त लावण्यात आला होता. आसेगाव, चांदूर बाजार, ब्राम्हणवाडा थडी आणि शिरजगाव कसबा पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया शांततेत सुरू होती. तसेच अचलपूर पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.शुभमकुमार (आयपीएस) हे स्वत: पेट्रोलिंग करून परिस्थिती वर नियंत्रण ठेवून होते. अचलपूर मतदार संघात आजच्या मतदान नंतर जवळपास तिहेरी लढतीचे चित्र स्पष्ट झाले असून यामध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे व महाविकास आघाडी चे उमेदवार बबलू देशमुख, भारतीय जनता पार्टी महायुती चे उमेदवारी प्रवीण तायडे, प्रहार जनशक्ती परिवर्तन महाशक्ती चे उमेदवार बच्चू कडू हे आहे.

मागील 20 वर्षापासून आमदार बच्चू कडू हे या मतदार संघाचे नेतृत्व करत आहे. तर मागील 15 वर्ष पासून बबलू देशमुख हे त्यांचे काँग्रेस कडून प्रतिस्पर्धी राहिले आहे. भाजप ने प्रवीण तायडे यांना उमेदवारी देऊन यावेळी मतदार संघात नविन चेहरा दिला. त्यामुळे सुरुवातीला चर्चेत नसलेली भाजप मतदानाच्या दिवशी चांगलीच चर्चेत पहायला मिळाली. या निवडणूकीमध्ये अपक्ष देखील विजयी उमेदवारा ला धक्का देऊ शकते, हे मात्र नक्की. एकंदरीत अचलपूर मतदार संघातील 22 उमेदवार यांचे भविष्य आज मतपेटी मध्ये बंद झाले असून 23 नोव्हेंबरला कोण विजयाचा गुलाल उधळणार हे ठरतील. मात्र मतदान नंतर अनेकांना आता निकालाचे डोहाळे लागले आहे.

# आधी हक्क मग कर्तव्य!

## नवरदेव वऱ्हाड्यासह चक्क मतदान केंद्रावर!



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.20 )** - तालुक्यातील मालखेड येथील नवरदेव सूरज विजय अंबाडकर यांनी संपुर्ण वऱ्हाडाला सोबत घेऊन आधी सकाळीच आपल्या मतदानाचा हक्क बजाविला नंतर दारव्हा येथील विवाहस्थळ गाठले.

अभियंता असलेल्या सूरज अंबाडकर यांचे सहा महिन्यांपूर्वीच दारव्हा येथील प्राध्यापिका असलेल्या माधुरी माणिकराव बदुकले यांच्याशी लग्न ठरले. लग्नाची तारीख आधीच ठरल्याने मतदानाची तारीखही तीच आली. लग्नपत्रिका इतर सर्व तयारी झाल्यामुळे आता तारीख बदलविणे शक्य नव्हते, त्यामुळे आधी मतदान मग लग्न असेच नवरदेवाने ठरविल्याने, त्यांनी आधी मतदान केले व मग आपल्या वऱ्हाडी मंडळीला घेऊन विवाहस्थळ गाठले. या कृतीचे सर्वत्र कौतुक होत असून सर्वांनी मतदान करुन लोकशाही बळकट करण्याचा संदेश यावेळी नवरदेवाने दिला.

### स्वीपचा प्रभाव

यावर्षी मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी निवडणूक आयोगातर्फे प्रयत्न केले जात आहेत. चांदूर रेल्वे स्वीपने अनेक उपक्रम राबविले. गावात आठवडी बाजारात पत्रके वाटण्यापासून तर गावकऱ्यांपर्यंत मतदानाचा संदेश स्वीपच्या माध्यमातून देण्यात आला. नोडल अधिकारी संदीप बोडखे, स्वीप सदस्य सुधीर केने व स्वीपचे सर्व सहकारी यांचा हा प्रभाव होता म्हणूनच मी माझा हक्क कर्तव्यआधी बजावला असे मनोगत नवरदेव सुरजने यावेळी व्यक्त केले.